नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - २९७ Issue - 297 | वार गुरुवार दि. १९ मार्च २०२६ Blow- Thursday Date 19 March 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@gmail.com

## महाराष्ट्र मोटार वाहन कर सुधारणा विधेयक एकमताने मंजूर

### गाड्या घेणं महागणार; पर्यावरण कर दुपटीने वाढवला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्र मोटार वाहन कर (सुधारणा) विधेयक, २०२६ (Maharashtra Motor Vehicles Tax mendment Bill) आज विधिमंडळात एकमताने मंजूर करण्यात आले आहे. राज्यातील पर्यावरण संरक्षण, आर्थिक शिस्त आणि औद्योगिक विकास यांचा समतोल साधण्याच्या दृष्टीने हे विधेयक महत्त्वाचे ठरणार आहे. या विधेयकाद्वारे वाढत्या वायू प्रदूषणावर नियंत्रण मिळवण्यासाठी जुन्या आणि प्रदूषणकारी वाहनांवरील पर्यावरण करात वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

**सुधारित कर रचनेनुसार किती द्या लागणार कर?–** दुचाकी वाहनांसाठी पर्यावरण कर २००० रुपयावरुन ४००० रुपयांवर, पेट्रोल वाहनांसाठी ३००० रुपयांवरुन ६००० रुपयांवर, तर डिझेल वाहनांसाठी ३५०० रुपयांवरुन ७००० रुपये करण्यात आला आहे. हा कर दर पाच वर्षांसाठी एकरकमी आकारला जाणार आहे. या सुधारित कर रचनेमुळे राज्याला दरवर्षी सुमारे १६० कोटींपेक्षा अधिक अतिरिक्त महसूल मिळणार असून हा निधी रस्ता सुरक्षा, आधुनिक परिवहन सुविधा, ढड प्रणाली आणि प्रशिक्षणासाठी वापरण्यात येणार आहे.





**इलेक्ट्रिक वाहनांचा स्वीकार करण्यास प्रोत्साहन मिळणार :** तसेच, औद्योगिक क्षेत्राला दिलासा देत क्रेन वाहनांवरील मोटार वाहन करासाठी ३० लाखांची कमाल मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. यामुळे बांधकाम आणि पायाभूत सुविधा क्षेत्रातील गुंतवणुकीला चालना मिळण्याची अपेक्षा आहे. या विधेयकामुळे नागरिकांना बीएस–६ आणि इलेक्ट्रिक वाहनांचा स्वीकार करण्यास प्रोत्साहन मिळणार असून राज्याच्या पर्यावरणीय धोरणाला बळकटी मिळेल. याशिवाय ग्रामीण आणि आदिवासी भागात दरवर्षी जास्तीत जास्त रोजगार निर्मिती होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. महत्त्वाचे म्हणजे, या विधेयकामुळे राज्याच्या एकत्रित निधीवर कोणताही अतिरिक्त भार पडणार नाही. या उलट महसूल वाढीस मदत होणार आहे. सभागृहातील सर्व पक्षांच्या सदस्यांनी या विधेयकाचे स्वागत करत एकमताने मंजुरी दिली आहे. त्यामुळे राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी हा निर्णय महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी हा निर्णय महत्त्वाचा टप्पा ठरणार : प्रताप सरनाईक

महत्त्वाचे म्हणजे, या विधेयकामुळे राज्याच्या एकत्रित निधीवर कोणताही अतिरिक्त भार पडणार नसून उलट महसूल वाढीस मदत होणार आहे. सभागृहातील सर्व पक्षांच्या सदस्यांनी या विधेयकाचे स्वागत करत एकमताने मंजुरी दिली, त्यामुळे राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी हा निर्णय महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. असे प्रतिपादन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले.

## सोलापूर जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदी दिपक वैद्य, उपाध्यक्षपदी इंद्रजीत पवार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : सोलापूर जिल्हा परिषदेच्या नूतन अध्यक्षपदी बार्शीचे दीपक वैद्य यांची तर सोलापूर जिल्हा परिषदेच्या उपाध्यक्षपदी इंद्रजीत पवार यांची निवड झाली आहे. प्रारंभी जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी निवड जाहिर करून जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दीपक वैद्य व उपाध्यक्ष इंद्रजीत पवार यांचा सन्मान करून शुभेच्छा दिल्या. त्यांनतर जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात आज राज्याचे ग्रामविकास व पंचायत राज मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते यांचे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दीपक वैद्य व उपाध्यक्ष इंद्रजीत पवार यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी आमदार सचिन कल्याणशेट्टी , निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, माजी आमदार राजाभाऊ राऊत, माजी आमदार प्रशांत परिचारक, माजी आमदार राजन पाटील, माजी आमदार राम सातपुते, माजी आमदार दिपक साळुंखे, गटनेत्या रश्मी बागल, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर , उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी सुर्यकांत भुजबळ, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मिनाक्षी वाकडे, कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी, राज्य प्रांतिक सदस्य शहाजी पवार , भाजपाचे जिल्हाध्यक्ष शशीकांत चव्हाण, चेतनसिंह केदार, यांचे सह सर्व जिल्हा परिषद सदस्य व विभाग प्रमुख, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.




**ग्रामविकास मंत्री अध्यक्ष व उपाध्यक्षांचे दालनात..!**

ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांनी अध्यक्ष दीपक वैद्य व उपाध्यक्ष इंद्रजीत पवार व गटनेत्या रश्मी बागल यांचे कार्यालयात जाऊन त्यांना खुर्चीवर बसवून सन्मानित केले. सिईओ कुलदीप जंगम यांनी देखील अध्यक्ष वैद्य व उपाध्यक्ष पवार यांचे दालनात जाऊन सन्मान केला.

## राज्यातील सर्व जमिनींच्या फेरफार नोंदी तपासणार; महसूलमंत्री बावनकुळे यांची घोषणा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई: महसूल कायद्यातील कलम १५५ चा गैरवापर करून जमिनीच्या नोंदीत फेरफार करणाऱ्या आणि सर्वसामान्यांच्या जमिनी हडपणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर अतिशय कठोर कारवाई करण्यात येईल. तसेच राज्यात असा प्रकार आणखी कुठे झाला याची सर्वंकष चौकशी करण्याचे आदेश दिले असून, आता पुणे जिल्ह्याप्रमाणेच राज्यातील सर्व जिल्ह्यांमधील मागील पाच वर्षांतील कलम १५५ च्या आदेशांची चौकशी करून दोन महिन्यांत अहवाल सादर केला जाईल, अशी घोषणा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज विधान परिषदेत केली. सध्या पुणे विभागातीलच गैरव्यवहार पुढे आला असून, महाराष्ट्रातील अशा नोंदी तपासण्याचे आदेश सर्व विभागीय आयुक्तांना दिले आहेत. त्यानंतर हा प्रकार किती मोठा आहे, याची कल्पना येईल. पुणे विभागातील या अतिगंभीर प्रकरणांवर पुढील सात दिवसांत प्राथमिक कारवाई केली जाईल. हा चौकशी अहवाल प्राप्त झाल्यावर सुरू असलेल्या अधिवेशनाचे कामकाज संपण्यापूर्वीच यावर केलेल्या कारवाईचा सविस्तर 'क्शन टेकन रिपोर्ट' (एटीआर) सभागृहासमोर ठेवला जाईल, असे आश्वासनही महसूलमंत्री बावनकुळेयांनी सभागृहात दिले. प्राथमिक माहितीनुसार, राज्यातील सुमारे दीड ते दोन लाख कुटुंबांवर परिणाम झाल्याची शक्यता असून नागरिकांना न्याय मिळवून देणे हे शासनाचे प्राधान्य असल्याचे स्पष्ट करून दोषी अधिकारी कितीही मोठ्या पदावरील असले तरी त्यांच्यावर कारवाई टाळली जाणार नाही, असेही मंत्री बावनकुळे यांनी सभागृहात ठामपणे सांगितले.



ॲड. अनिल परब यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधीला उत्तर देताना मंत्री बावनकुळे म्हणाले की, महसूल विभागातील कलम १५५ चा मोठ्या प्रमाणात गैरवापर झाल्याच्या तक्रारी शासनाच्या निदर्शनास आल्या आहेत. शुद्धलेखन दुरुस्तीसाठी असलेल्या तरतुदीचा वापर करून काही ठिकाणी जमिनीच्या मालकीत फेरफार करणे, क्षेत्रफळ कमी–जास्त करणे किंवा नोंदीत बदल करणे असे गंभीर प्रकार घडल्याचे तपासात आढळले आहे.

विभागीय आयुक्त, नाशिक यांच्या समितीने पुणे जिल्ह्यातील ३८,०२७ प्रकरणांपैकी २,३८३ प्रकरणांची प्रत्यक्ष तपासणी केली. त्यामध्ये ऑनलाईन ऐवजी ऑफलाईन अर्ज स्वीकारून घाईघाईने घेतलेले निर्णय. हितसंबंधितांना नोटिसा न बजावता दिलेले आदेश, भोगवटदार वर्ग–२ ची जमीन वर्ग–१ करणे आणि क्षेत्रफळात वाढ करणे, इतर हक्कातील व्यक्तींची नावे बेकायदेशीरपणे कमी करणे अशा बाबी निदर्शनास आले आहे. तपासात १५ अधिकारी अतिगंभीर, ८२ गंभीर आणि ५५ अधिकारी मध्यम स्वरूपाच्या अनियमिततेत दोषी आढळले असल्याची माहिती मंत्री बावनकुळे यांनी दिली. समितीच्या शिफारशीनुसार शासनाने कारवाई निश्चित केली आहे.'अ' वर्ग (अतिगंभीर) १३ प्रकरणांत फौजदारी कारवाई आणि कठोर विभागीय चौकशी होईल. 'ब' वर्ग (गंभीर) २४७ प्रकरणांत विभागीय चौकशी आणि संबंधित अधिकाऱ्यांची पुणे विभागाबाहेर अकार्यकारी पदावर बदली. 'अ' वर्गातील सर्व जबाबदार अधिकारी व कर्मचारी तसेच ३० पेक्षा जास्त अनियमितता आढळलेल्या अधिकाऱ्यांना तात्काळ निलंबित करण्यात येणार आहे. ज्या प्रकरणांच्या संचिका (फाईल्स) गहाळ आहेत, त्यांच्यावर सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ नुसार फौजदारी कारवाई केली जाईल.

**सोलापूर जिल्ह्यातील सांगोला तालुक्यात गारांचा तुफान पाऊस**

**नाशिक जिल्ह्यासह राज्यात अनेक ठिकाणी शेती पिकांचं नुकसान**

## राज्यात अवकाळी पावसाचा धुमाकूळ! फळ उत्पादक शेतकऱ्यांना मोठा फटका

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : राज्यात सध्या अवकाळी पावसानं धउमाकूळ घातला आहे. अनेक ठिकाणी वादळी वाऱ्यासह गारांचा पाऊस सुरु झाला आहे. याचा मोठा फटका शेती पिकांना बसत आहे.

राज्यात सध्या अवकाळी पावसानं धउमाकूळ घातला आहे. अनेक ठिकाणी वादळी वाऱ्यासह गारांचा पाऊस सुरु झाला आहे. याचा मोठा फटका शेती पिकांना बसत आहे. विशेषत फळ बाग शेतकरी मोठ्या चिंतेत आहेत. द्राक्ष बागांसह, आंबा, काजू, केळी उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे.

सांगोला तालुक्यातील जुनोनी जुजारपूर वगैरे परिसरात गेले दोन तासापासून तुफानी गारांचा पाऊस सुरू असल्याने द्राक्ष आंबा आणि डाळिंबाचे मोठे नुकसान झाले आहे. गेल्या दोन तासापासून मेघगर्जनेसह गारांचा अक्षरशः सडा सर्वत्र पडत असून यामुळे शेतातील द्राक्षांचे मणी फुटले आहेत तर डाळिंबाचा मोहोर गळून पडला आहे. त्याशिवाय फळाला आलेल्या केशर आंब्याचे ही मोठे नुकसान झाले असून अनेक कैऱ्या पडून गेल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. काढणीला आलेला गहू आणि शेतातून उतरवलेल्या ज्वारीलाही याचा मोठा फटका बसला आहे. आज सायंकाळी बीजाचा कडकडाट आणि वादळी वाऱ्यानंतर या गाराच्या पावसाला सुरुवात झाली. दरम्यान डिकसळ येथे एका झाडावर वीज पडून झाड भस्मसात झाल्याची माहिती समोर आली आहे जुनोनी , तिप्पेहळी ,जुजारपूर , करांडेवाडी , गौडवाडी , कोळे , बुद्धेहाळ या सांगोला तालुक्यातील परिसरामध्ये जोरदार गारांचा पाऊस झाला आहे. शेतमालाचे बरेच नुकसान झाल्याची शक्यता आहे.

सातारा जिल्ह्यातील फलटण तालुक्यात गारांचा मोठा पाऊस

सातारा जिल्ह्यात सकाळपासूनच ढगाळ वातावरण असून आज संध्याकाळच्या सुमारास फलटण तालुक्यात धुमाळवाडी सह गिरवी भागात विजेच्या कडकडाटासह गारांचा पाऊस झाला. या पावसामुळं काढणीस आलेल्या पिकांसह धुमाळवाडीतील डाळिंब फळा बरोबर आंब्याचा मोहराचे देखील नुकसान होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. साधारण अर्धा तास पडलेल्या गारपिटीमुळे याचा पिकांवर परिणाम होणार आहे.

नाशिक जिल्ह्यातील ताहाराबाद येथे अवकाळी पावसानं हजेरी लावली आहे, यामुळं शेती पिकांचं मोठं नुकसान झालं आहे. वादळ वारा व विजेच्या कडकडाटासह गारपीट झाली आहे. काढणीला आलेला कांदा व शेती पिकांचे नुकसान होण्याची शक्यता आहे. सटाणा तालुक्यातील मुल्हेर, अंतापूर, ताहाराबाद परिसरात जोरदार पाऊस सुरु आहे. बाजारपेठेतील व्यापारी वर्गाची पावसामुळे झाली धावपळ झाली.





गोंदियाच्या मोरगाव अर्जुनी तालुक्यात वादळी वाऱ्यासह गारपीट

गोंदियाच्या मोरगाव अर्जुनी तालुक्यातील शिरोली महागाव परिसरात आज अचानक वादळी वारा व गारपिटसह अवकाळी पावसाने हजेरी लावली. अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे मका पिकाला फटका बसण्याची शक्यता आहे. हवामान विभागाच्या वतीने महाराष्ट्रातील काही भागांमध्ये अवकाळी पावसाची शक्यता वर्तविण्यात आली होती. हवामान विभागाचा हा अंदाज खरा ठरला असून गोंदिया जिल्ह्याच्या मोरगाव अर्जुनी तालुक्यातील महागाव शिरोली परिसरात अचानक गारपटीसह अवकाळी पावसाने हजेरी लावली. या पावसामुळं मका पिकाला फटका बसण्याची शक्यता असून धान पिकाला या पावसाचा फायदा होणार आहे. अचानक आलेल्या पावसामुळं वातावरणात गारवा निर्माण झाला आहे.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातही अवकाळी पाऊस

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात सध्या कडाक्याचे ऊन पडत असतानाच, सोयगाव शहरात निसर्गाचे वेगळेच रुप पाहायला मिळाले. दुपारच्या सुमारास अचानक वातावरणात बदल झाला आणि ढगांच्या गडगडाटासह अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली. या पावसाने नागरिकांची चांगलीच तारांबळ उडावली. केवळ पाऊसच नाही, तर सोयगाव शहर आणि परिसरात मोठ्या प्रमाणात गारांचा वर्षाव झाला आहे. रस्त्यावर आणि घरांच्या छतावर गारांचा पांढरा शुभ्र थर साचलेला पाहायला मिळत होता. मार्च महिन्याच्या उत्तरार्धात अशा प्रकारे गारा पडल्याने स्थानिक नागरिकही अवाक झाले आहेत. या गारपिटीमुळे हवेत तात्पुरता गारवा निर्माण झाला असला तरी, हे संकट अधिक गडद होण्याची भीती व्यक्त होत आहे.

## संपादकीय....

## सरकारचा ॲक्शन मोड

महसूल कायद्यातील कलम १५५ चा गैरवापर करून जमिनीच्या नोंदीत फेरफार करणाऱ्या आणि सर्वसामान्यांच्या जमिनी हडपणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर अतिशय कठोर कारवाई करण्यात येईल. तसेच राज्यात असा प्रकार आणखी कुठे झाला याची सर्वंकष चौकशी करण्याचे आदेश दिले असून, आता पुणे जिल्ह्याप्रमाणेच राज्यातील सर्व जिल्ह्यांमधील मागील पाच वर्षांतील कलम १५५ च्या आदेशांची चौकशी करून दोन महिन्यांत अहवाल सादर केला जाईल, अशी घोषणा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज विधान परिषदेत केली. सध्या पुणे विभागातीलच गैरव्यवहार पुढे आला असून, महाराष्ट्रातील अशा नोंदी तपासण्याचे आदेश सर्व विभागीय आयुक्तांना दिले आहेत. त्यानंतर हा प्रकार किती मोठा आहे, याची कल्पना येईल. पुणे विभागातील या अतिगंभीर प्रकरणांवर पुढील सात दिवसांत प्राथमिक कारवाई केली जाईल. हा चौकशी अहवाल प्राप्त झाल्यावर सुरू असलेल्या अधिवेशनाचे कामकाज संपण्यापूर्वीच यावर केलेल्या कारवाईचा सविस्तर 'क्शन टेकन रिपोर्ट' (एटीआर) सभागृहासमोर ठेवला जाईल, असे आश्वासनही महसूलमंत्री बावनकुळेयांनी सभागृहात दिले. प्राथमिक माहितीनुसार, राज्यातील सुमारे दीड ते दोन लाख कुटुंबांवर परिणाम झाल्याची शक्यता असून नागरिकांना न्याय मिळवून देणे हे शासनाचे प्राधान्य असल्याचे स्पष्ट करून दोषी अधिकारी कितीही मोठ्या पदावरील असले तरी त्यांच्यावर कारवाई टाळली जाणार नाही. महसूल विभागातील कलम १५५ चा मोठ्या प्रमाणात गैरवापर झाल्याच्या तक्रारी शासनाच्या निदर्शनास आल्या आहेत. शुद्धलेखन दुरुस्तीसाठी असलेल्या तरतुदीचा वापर करून काही ठिकाणी जमिनीच्या मालकीत फेरफार करणे, क्षेत्रफळ कमी-जास्त करणे किंवा नोंदीत बदल करणे असे गंभीर प्रकार घडल्याचे तपासात आढळले आहे. विभागीय आयुक्त, नाशिक यांच्या समितीने पुणे जिल्ह्यातील ३८,०२७ प्रकरणांपैकी २,३८३ प्रकरणांची प्रत्यक्ष तपासणी केली. त्यामध्ये ऑनलाईन ऐवजी ऑफलाईन अर्ज स्वीकारून घाईघाईने घेतलेले निर्णय. हितसंबंधितांना नोटिसा न बजावता दिलेले आदेश, भोगवटदार वर्ग-२ ची जमीन वर्ग-१ करणे आणि क्षेत्रफळात वाढ करणे, इतर हक्कातील व्यक्तींची नावे बेकायदेशीरपणे कमी करणे अशा बाबी निदर्शनास आले आहे.

# गुढीपाडवा : नवचैतन्य, स्वाभिमान आणि नवसंस्कृतीचा उत्सव




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भारतीय संस्कृतीत सण-उत्सव हे केवळ आनंदाचे क्षण नसतात; ते समाजाच्या इतिहासाचे, परंपरेचे आणि सामूहिक भावनांचे प्रतीक असतात. प्रत्येक सणामागे एखादी प्रेरणा, एखादा ऐतिहासिक संदर्भ आणि जीवनाला दिशा देणारा संदेश दडलेला असतो. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात अत्यंत महत्त्वाचे स्थान असलेला सण म्हणजे गुडीपाड़वा. हा दिवस केवळ नवीन वर्षाचा प्रारंभ नाही, तर नवचैतन्य, नवउमेद आणि नव्या आशेचा आरंभ आहे. वसंत ऋतूच्या आगमनासोबत येणारा गुढीपाडवा हा सण भारतीय संस्कृतीच्या जीवनदायी परंपरेचे प्रतीक आहे. निसर्गात जशी नवपालवी फुटते, तशीच नव्या वर्षाची सुरुवात जीवनात नवीन संधी, नवीन विचार आणि नवीन ऊर्जा घेऊन येते. म्हणूनच गुढीपाडवा हा केवळ धार्मिक सण नाही; तो आशावाद, पुनरुत्थान आणि सकारात्मकतेचा उत्सव आहे.



**– प्रवीण बागडे, नागपूर**
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९
ई-मेल: pravinbagde@gmail.com

भारतीय पंचांगानुसार चैत्र शुद्ध प्रतिपदेला नवीन वर्षाची सुरुवात होते. याच दिवशी महाराष्ट्रात गुढीपाडवा साजरा केला जातो. हा दिवस उगड़ी म्हणून आंध्र प्रदेश आणि कर्नाटकात साजरा होतो, तर उत्तर भारतात याच काळात चैत्र नवरात्री सुरू होते. यातून भारतीय संस्कृतीची एक महत्त्वाची वैशिष्ट्य दिसते, भौगोलिक आणि सांस्कृतिक विविधतेतूनही एकात्मतेची भावना. भारताच्या विविध भागात नाव वेगवेगळी असली तरी नववर्षाचे स्वागत करण्यामागची भावना एकच आहे नवीन सुरुवात, नव्या आशा आणि नव्या शक्यता. गुढीपाडव्याच्या दिवशी घराच्या प्रवेशद्वारावर उभारली जाणारी गुढी ही विजय, समृद्धी आणि स्वाभिमानाचे प्रतीक मानली जाते. बांबूच्या काठीवर रेशमी वस्त्र, साखरेची गाठी, कडुलिंबाची पाने आणि वर तांब्याचा किंवा चांदीचा कलश लावून गुढी उभारली जाते. ही गुढी केवळ धार्मिक परंपरा नाही; ती विजयाचा आणि सकारात्मकतेचा ध्वज आहे. घराच्या दाराशी उभारलेली गुढी जणू सांगत असते, अडचणी कितीही असल्या तरी आशेचा ध्वज उंच ठेवावा.

गुढीपाडव्याशी अनेक ऐतिहासिक आणि सांस्कृतिक संदर्भ जोडलेले आहेत. काही परंपरांनुसार हा दिवस इतिहासकारांच्या मते शिवाजी यांच्या विजयाचे प्रतीक म्हणूनही गुढी उभारली जाते. या संदर्भांचा अर्थ इतकाच गुढी म्हणजे विजयाचा ध्वज. अन्याय, पराभव किंवा संकटावर मात करून उभे राहण्याची प्रेरणा या सणातून मिळते. गुढीपाडवा हा सण निसर्गाशीही अतूटपणे जोडलेला आहे. चैत्र महिन्यात निसर्गात नव्या पालवीचे आगमन होते. झाडांना नवी पाने फुटतात, फुलांचा सुगंध दरवळतो, वातावरणात ताजेपणा भरतो. हा निसर्गाचा संदेश आहे, जीवनात कितीही कठीण काळ आला तरी नव्या सुरुवातीची संधी नेहमी असते. म्हणूनच गुढीपाडवा हा निसर्गाशी एकरूप होऊन नव्या जीवनाचा उत्सव साजरा करण्याचा दिवस आहे. सण हे समाजाला एकत्र आणण्याचे माध्यम असतात. गुढीपाडव्याच्या दिवशी लोक एकमेकांना भेटतात, शुभेच्छा देतात, आनंद वाटून घेतात.

आजच्या धकाधकीच्या जीवनात माणसांमधील संवाद कमी होत चालला आहे. तंत्रज्ञानाने अंतर कमी केले असले तरी मनांमधील दुरावा वाढत आहे. अशा वेळी गुढीपाडवा आपल्याला स्मरण करून देतो, समाजाचा खरा आधार म्हणजे परस्परांचे नाते आणि विश्वास. आजचा काळ वेगवान बदलांचा आहे. तंत्रज्ञान, अर्थव्यवस्था आणि जीवनशैली झपाट्याने बदलत आहे. या बदलांच्या प्रवाहात अनेकदा आपली सांस्कृतिक परंपरा मागे पडताना दिसते. सण-उत्सव अनेकदा केवळ औपचारिकतेपुरते मर्यादित राहतात. परंपरेचा अर्थ न समजता केवळ विधी पार पाडले जातात. मात्र गुढीपाडवा आपल्याला सांगतो, सण साजरा करण्याचा खरा अर्थ म्हणजे जीवनात सकारात्मकता, मूल्ये आणि सांस्कृतिक अभिमान जपणे.

गुढीपाडवा म्हणजे केवळ शुभेच्छा देण्याचा दिवस नाही; तो नवीन संकल्प करण्याचा दिवस आहे. समाज म्हणून आपण स्वतःला प्रश्न विचारायला हवा,

आपण अधिक संवेदनशील समाज घडवत आहोत का? आपण सामाजिक समतेच्या दिशेने पावले टाकत आहोत का? आपण पर्यावरणाचे रक्षण करत आहोत का? नवीन वर्षाचा खरा अर्थ म्हणजे केवळ कालगणनेचा बदल नाही, तर विचारांचा आणि कृतीचा बदल. जागतिकीकरणाच्या या युगात अनेक संस्कृती एकमेकांशी मिसळत आहेत. हे सकारात्मक असले तरी आपल्या संस्कृतीची ओळख जपणेही तितकेच महत्त्वाचे आहे. गुढीपाडवा हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक अस्मितेचा सण आहे. या सणातून आपली परंपरा, आपले मूल्य आणि आपली सांस्कृतिक ओळख जपली जाते. गुढीपाडवा हा सण आपल्याला एक महत्त्वाचा संदेश देतो,

जीवनात कितीही संकटे आली तरी आशेचा ध्वज उंच ठेवावा. गुढी म्हणजे विजयाचे प्रतीक, नववर्ष म्हणजे नव्या संधींचा प्रारंभ आणि हा सण म्हणजे जीवनाकडे सकारात्मकतेने पाहण्याची प्रेरणा.

आजच्या बदलत्या काळात गुढीपाडव्याचा खरा अर्थ समजून घेतला तर हा सण केवळ परंपरा राहणार नाही; तो समाजाला दिशा देणारा प्रेरणादायी उत्सव ठरेल. नवीन वर्ष आपल्यासाठी प्रगती, समता, आनंद आणि समृद्धी घेऊन येवो, समाजात बंधुभाव वाढो आणि प्रत्येकाच्या आयुष्यात नवचैतन्य फुलो, हीच या मंगल दिनी अपेक्षा. गुढीपाडव्याच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

# मानवता स्वतंत्र करणारा चवदार तळे सत्याग्रह

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

डॉ. बाबासाहेबांनी दि. २० मार्च, १९२७ साली महाड येथे चवदार तळ्याच्या सत्याग्रह लढ्याचे नेतृत्व केले. आज हा दिवस 'सामाजिक सबलीकरण दिवस' म्हणून साजरा केला जातो. त्यानिमित्ताने या सत्याग्रहाचे महत्त्व आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मौलिक विचार यांचा आढावा घेणारा हा लेख...


भारतीय लोकशाहीत आंदोलनांचे स्थान महत्त्वपूर्ण आणि अनन्यसाधारण आहे. व्यापक जनहितासाठी वापरले जाणारे ते एक प्रभावी साधन आहे. महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारख्या महान नेत्यांनी विचारांच्या, तत्वांच्या भक्कम बैठकीवर समाजात सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्यासाठी केलेल्या यशस्वी आंदोलनांचा इतिहास सर्वज्ञात आहे. डॉ. बाबासाहेबांनी दि. २० मार्च, १९२७ साली महाड येथे चवदार तळ्याचा सत्याग्रहाच्या लढ्याचे नेतृत्व केले. आज हा दिवस 'सामाजिक सबलीकरण दिवस' म्हणून साजरा केला जातो. त्यांच्या त्या पहिल्या सामाजिक सत्याग्रहाच्या ९७ व्या क्रांतिदिनानिमित्त त्यांच्या आंदोलनांमधील विधायकता, सामाजिकता आणि देशशरण भूमिका आपल्याला आंदोलने कशी असावीत? कशी करावीत? कोणत्या गोष्टींचे भान ठेवावे? याचा वस्तूपाठ देते. त्यातील यशस्विता जपण्यासाठी त्यांनी जी जीवापाड मेहनत घेतली त्याला तोडच नाही. त्यातून त्यांचे विचार आणि कृतीतील निखालस द्रष्टेपण दिसून येते.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राष्ट्रनिर्मितीसाठी योगदान अमूल्य आहे. सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, धार्मिक, परराष्ट्र व्यवहार, पर्यावरण अशा अनेक विषयांवर त्यांचे विचार आणि कार्य नेहमीच प्रेरणादायी ठरले, ते आपल्या असामान्य, अलौकिक आणि आदरणीय गुणांमुळे आणि कर्तृत्वामुळे.ते जगातील कुठल्याही आणि कोणत्याही सुज्ञ आणि जिज्ञासू व्यक्तीच्या चिंतनाचा, मननाचा, आदराचा, आनंदाचा, लेखनाचा आणि त्यांच्या कृतिशिलतेचा विषय होत आहे, ही आवर्जून समजून घ्यावी, अशी अत्यंत महत्त्वपूर्ण वास्तविकता आहे.

डॉ. बाबासाहेबांनी १९१६ सालापासून आपल्या निहित सामाजिक कार्याचा आरंभ केला. कृतिशूरपणा हा ऐतिहासिक महापुरुषांचा स्थायीभाव असतो. डॉ. बाबासाहेबांचे महनीय कार्य असे की, कोट्यावधी जनतेच्या मनात त्यांनी अन्यायाची चीड निर्माण केली, स्वाभिमानाची ठिणगी पेटवली.शतकानुशतकांचे वैचारिक साखळदंड तोडून टाकले. हे कार्य सहज घडण्यासारखे नव्हते. सर्वच दृष्टींनी नागवला गेलेला दलित समाज त्याच्या स्वतःच्यापायावर उभा करावयाचा असेल, तर त्याला आत्मस्थितीचे ज्ञान दिले पाहिजे. आपले जन्मसिद्ध अधिकार कोणते? याची जाणीव त्याच्या चित्तात उत्पन्न केली पाहिजे. आपण व आपल्या भोवतीच्या जगाचे यथार्थ भान आल्याशिवाय गुलामाला आपली गुलामगिरीही कळत नाही. गुलामगिरी कळूनही त्याच्यात त्याविरूद्ध जाणीव उत्पन्न केल्याशिवाय तो संघर्ष करू शकत नाही, असा संघर्ष करण्यासाठी अपार कष्ट केले. एक सशक्त, स्वाभिमानी आणि समतायुक्त समाजनिर्मितीसाठी डॉ. बाबासाहेबांनी आपल्या जीवनाचेअग्निकुंड केले.

डॉ. आंबेडकर आपले कृतिशील विचार वृत्तपत्रांच्या माध्यमातून, भाषणांतून आणि गावोगावी पसरलेल्या अस्पृश्य वस्तीतील दीनदलितांना पोटाशी धरून वर्षानुवर्षे सांगत राहिले. कोणताही नेता जनतेच्या सर्व स्तरात प्रेमाने, आपुलकीने वावरतो आणि सामान्यातील सामान्य होऊन त्यांच्यातील माणूसपणाला आत्मियतेने उदराशी धरतो, तेव्हा त्या जनसमूहाचे रुपांतर एकात्म समाजात होते. असा एकात्म समाज हा समता आणि बंधुतेच्या पायावरच उभा राहील, अशी त्यांची धारणा होती. डॉ. बाबासाहेबांनी आरंभलेल्या महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह, नाशिकच्या काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह, पुण्याच्या पर्वती मंदिर सत्याग्रह, अंबामाता मंदिर प्रवेश सत्याग्रह अशा विविध सामाजिक लढ्यांबरोबरच राजकीय लढ्याचा पुणे करार असेल, या सर्व घटनांच्या पार्श्वभूमिवर त्यांनी आपल्या नाशिकच्या दौर्यात दि. १३ ऑक्टोबर, १९३५ रोजी येवला येथे अस्पृश्यगटातील सर्वांची परिषद झाली. या परिषदेच्या निमित्ताने उपस्थित असलेली सुमारे दहा हजार श्रोत्यांसमोर 'आपला समाज स्वतंत्र करावा' अशा आशयाचा लिखित अंतस्थ हेतू डॉ. बाबासाहेबांनी प्रकट केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या सामाजिक न्यायाच्या संग्रामामधील 'महाडचा लढा' हे एक सुवर्णपान आहे. जनतेची तहान भागविणारे असंख्य




पाणवठे आपल्या देशात आहेत. परंतु, सामाजिक न्यायाची तहान भागविणारा पाणवठा महाडमध्ये आहे. त्याचे नाव आहे 'चवदार तळे'. आपल्या देशातीलअनेक तळी, तलाव उदा. मानसरोवर, पुष्कर तलाव तसेच गोदावरीच्या पात्रातील रामकुंड असे अनेक पाणवठे धार्मिक कारणांसाठी तीर्थक्षेत्रे झाली आहेत. महत्त्वाचे म्हणजे, चवदार तळे मात्र सामाजिक तीर्थक्षेत्र झालेले आहे. या तीर्थाची यात्रा दरवर्षी मार्च महिन्यात भरते. डॉ. बाबासाहेबांनी दि. २० मार्च, १९२७ साली महाड येथे चवदार तळ्याचा सत्याग्रह केला, त्यांच्या त्या पहिल्या सामाजिक सत्याग्रहाच्या ९४व्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या आंदोलनांमधील विधायकता, सामाजिकता आणि देशशरण भूमिका आपल्याला आंदोलने कशी असावीत? कशी करावीत? कोणत्या गोष्टींचे भान ठेवावे? त्यातील यशस्विता जपण्यासाठी त्यांनी जी जीवापाड मेहनत घेतली, त्याला तोडच नाही. त्यातून त्यांचे विचार आणि कृतीतील निखालस द्रष्टेपण दिसून येते.

अलीकडच्या काळातील आंदोलने ही आंदोलनांमधील सामाजिकतेला आणि राष्ट्रीयत्वाला मूठमाती देतील की काय? असा प्रश्न मनात उभा राहतो. या पार्श्वभूमीवर डॉ. बाबासाहेबांनी सामाजिक न्यायाच्या संदर्भात केलेल्या आंदोलनांचे वैचारिक महत्त्व अधोरेखित होते. त्यांनी केलेली आंदोलने ही सामाजिक समता प्रस्थापनेसाठी, आपले जन्मसिद्ध अधिकार प्रस्थापनेसाठी, समाजातील हिनत्वाचे भाव काढून टाकण्यासाठी आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे समाजाची मानसिकता बदलण्यासाठी होती.चवदार तळ्याच्या काठी उभे असलेले मूर्तिमंत धैर्य आणि निष्ठा यांचे रूप असलेले डॉ. बाबासाहेब उगवत्या सूर्यासारखे भासले. मुक्तीच्या मार्गावरील जनसमूहांचे ते नेतृत्व करणारे होते. 'स्वातंत्र्य मागून मिळत नसते, तर ते लढून मिळवावे लागते,' असे संदेश त्यांनी याठिकाणी दिला. आपल्या हाताच्या ओंजळीत त्यांनी पाणी घेतले, त्यांचेच अनुकरण तेथे उपस्थित असलेल्या हजारो अनुयायांनी केले. सत्याग्रहाचे खरे उद्दिष्ट असे होते की, पाणी ही निसर्गाची देणगी आहे आणि ते सर्वांना मिळालेच पाहिजे. अशा प्रकारे त्यांची शिकवण आणि विचार प्रत्येकाने मूर्त स्वरुपात आणणे आवश्यक आहे. पाणी पिण्याच्या क्रियेतून त्यांना सर्वांना हे दाखवून द्यायचे होते की, अत्याचाराची परिसीमा होते, तेव्हा लहानातला लहान जीवही बंड करून उठतो आणि अत्याचाराच्या बेड्या तोडून टाकतो.

डॉ. बाबासाहेबांनी चवदार तळ्याच्या सत्याग्रहाच्या वेळी दोन गोष्टी सांगितल्या होत्या. ते म्हणाले, पहिली गोष्ट म्हणजे आंदोलन करताना जागृतीचा अग्नी अखंड तेवत ठेवा. दुसरी गोष्ट म्हणजे, विचारात परिवर्तन झाल्याशिवाय आचरणात परिवर्तन होऊ शकणार नाही. अस्पृश्यांना समतेच्या आणि माणुसकीच्या हक्काची वागणूक नाकारली जात होती. त्यामुळे त्यांच्या नेतृत्वाखाली चवदार तळ्याचे पाणी सर्वांनी मिळून संघटितपणे पिण्याचे आंदोलन यशस्वी केले. त्याकरिता त्यांच्या विचार आणि कृतीत सूत्रबद्ध रचना आहे.व्यवस्था परिवर्तनाचे जे आंदोलन आम्ही चालवित आहोत ते आंदोलन चालवणारे लोक, आंदोलनास साथ देणारे लोक तसेच आंदोलनाची विचारधारा आणि उद्देश सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचवणार्या लोकांसाठी विचार हा अतिशय महत्त्वपूर्ण आहे. विचार समाजाला गती देतो, गतिमान करतो. जनतेने हा विचार बनवला, तयार केला आणि जगाने मानला, तर तो अनेकांना प्रेरित करतो, प्रेरणा देतो.

'विचारात परिवर्तन झाल्याशिवाय आचरणात परिवर्तन होत नाही,' ही गोष्ट बाबासाहेबांनी आंदोलनकर्त्यांना सांगण्याचे कारण म्हणजे त्यांच्यापुढे लक्ष्य असे होते की, आपल्या समाजाच्या आचरणात परिवर्तन करायचे आहे. तुम्ही नेता, कार्यकर्ता किंवा प्रचारक म्हणून लोकांमध्ये परिवर्तन करू शकता. कोणतीही व्यक्ती आचरण कसे करते, जसा त्या व्यक्तीचा विचार असतो किंवा व्यक्ती जो विचार करतो, त्याप्रमाणे त्याचे आचरणअसते.

एखादी व्यक्ती किंवा समाज चुकीच्या विचारांस चुकीचे न मानता, त्याचा स्वीकार करते आणि त्यामुळे चुकीचेच आचरण करत असेल, तर त्या चुकीच्या विचारांस चुकीचे ठरविण्याची जबाबदारी परिवर्तनाचे कार्य करणार्या समस्त लोकांचीच आहे. ज्यांनी चुकीचा विचार स्वीकारला आहे, त्यांना त्यांचा विचार कसा चुकीचा आहे, ते पटवून देत त्यांच्यासमोर दुसरा विचार ठेवला पाहिजे. अशा प्रकारे पर्यायाने दोन वेगळे विचार लोकांसमोर असायला हवेत. तुम्ही तो दुसरा विचार लोकांसमोर ठेवणार आहात, त्याच्यातून तुम्हाला हे सिद्ध करता आले पाहिजे की, त्यांनी स्वीकारलेला अगोदरचा विचार चुकीचा होता. जो विचार लोकांच्या आचरणामध्ये दिसून येतो तो त्यांच्या विचारात जर तुम्ही परिवर्तन केले, तर त्यावेळी त्यासंदर्भात तो विचार लोकांच्या आचरणामध्ये प्रतिबिंबित होईल. त्यामुळे डॉ. बाबासाहेबांना समाजात जे परिवर्तन घडवून आणायचे होते, त्यासाठी त्या समाजात प्रथम जागरूकता निर्माण करून त्यांच्या मानसिकतेमध्ये बदल घडवून आणण्याचे महत्कार्य त्यांनी केले.डॉ. बाबासाहेबांनी केलेल्या विविध आंदोलनांचा मागोवा घ्यायचा झाला, तर त्यांनी केलेली सर्व आंदोलने-सत्याग्रह प्रतिशोधासाठी नव्हती, तर प्रतिसादासाठी होती. राष्ट्रीय मालमत्तेचे नुकसान नाही, तर त्याच्या संवर्धनासाठी होती. ती अराष्ट्रीय तर कधीच नव्हती, तर राष्ट्र मजबूत करण्यासाठीच होती. ती एका महान राष्ट्रपुरुषाने राष्ट्रोन्नतीसाठी केलेली आदर्श आंदोलने होती. त्याचा आज आम्हाला विसर पडत चालला आहे. चवदार तळे सत्याग्रहाच्या स्मृतीदिनानिमित्त त्यांनी केलेल्या आंदोलनांच्या आदर्शाचा जागर करण्याची आज वेळ आलेली आहे.

**– डॉ. सुनील भंडगे**

# उंबरगावचे ग्रामपंचायत अधिकारी व शिपाई एसीबीच्या जाळ्यात




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत मंजूर घरकुलाच्या शेवटच्या हप्त्यासाठी लाभार्थ्यांकडून लाच मागितल्या प्रकरणी उंबरगाव (तालुका पंढरपूर) येथील ग्रामपंचायत अधिकारी आणि शिपाई यांना सोलापूर लाचलोचपत प्रतिबंधक विभागाचे (एसीबी) सापळा रचून पकडले. या कारवाईत ग्राम पंचायत शिपाई दत्तात्रय अभिमान कांबळे यांनी तक्रारदाराकडून बारा हजार रुपयाची लाच स्वीकारताना रंगेहात पकडण्यात आले.

या प्रकरणातील आरोपी मध्ये प्रशांत प्रकाश मुकरे(वय ४५ ) ग्रामपंचायत अधिकारी उंबरगाव, पंचायत समिती पंढरपूर तसेच दत्तात्रेय अभिमान कांबळे (वय ४५) ग्रामपंचायत शिपाई उंबरगाव यांचा समावेश आहे. या दोघांविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये कलम ७,७-अ व१२ अंतर्गत गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया पंढरपूर ग्रामीण पोलीस ठाण्यात सुरू आहे.

एसीबी कडून मिळालेल्या माहितीनुसार तक्रारदार यांना पंतप्रधान आवास योजनेतून घरकुल मंजूर झाले होते. या योजनेअंतर्गत एक लाख वीस हजार रुपये अनुदान मंजूर झाले होते. घरकुलाच्या शेवटचा हप्ता देण्यासाठी आरोपींनी तक्रारदाराकडे २० हजार रुपये ची लाच मागितली होती.

दिनांक १३ मार्च २०२६ रोजी पडताळणी कारवाईदरम्यान ग्रामपंचायत शिपाई दत्तात्रय कांबळे यांनी स्वतःसाठी तसेच ग्रामपंचायत अधिकारी प्रशांत मुखरे यांच्यासाठी लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्या त्यानंतर बारा हजार रुपये देण्याचे ठरले यानंतर दिनांक १६ मार्च २०२६ रोजी एसीबीच्या पथकाने सफरचला असता ग्रामपंचायत शिपाई दत्तात्रय कांबळे यांनी तक्रारदाराकडून १२००० रुपये लाच स्वीकारताना रंगेहात पकडले.

ही कारवाई एसीबी पुणे परिक्षेत्राचे पोलीस आयुक्त/व पोलीस अधीक्षक श्री देशपांडे अप्पर पोलीस अधीक्षक अजित पाटील तसेच पोलीस उपाधीक्षक प्रशांत चौगुले यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाई पोलीस निरीक्षक रवींद्र लांबाते पोलीस निरीक्षक शैलेश पवार तसेच एसीबी सोलापूरच्या पथकातील अधिकारी व कर्मचारी सहभागी होते.

शासकीय अधिकारी किंवा कर्मचारी यांनी कोणतेही काम करून देण्यासाठी कायदेशीर शुल्कव्यतिरिक्त लाचेची मागणी केल्यास नागरिकांनी घाबरून न जाता तात्काळलाच लुचपत प्रतिबंधक विभागाची संपर्क साधावा अशा प्रकारांमध्ये एसीबी कडून कठोर कारवाई करण्यात येते, असे प्रशांत चौगुले पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलापूर यांनी म्हणाले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# ऊसतोड महिला कामगारांच्या आरोग्य व सुरक्षिततेला प्राधान्य द्यावे

## राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांचे निर्देश; महिलांचे प्रश्न व स्त्रीभ्रूण हत्या प्रतिबंधक कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत आढावा बैठक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : ऊसतोड महिला कामगारांसाठी आरोग्य सुविधा, मुलांना शैक्षणिक सुविधा, कायदेविषयक साहाय्य पुरविण्यासह त्यांच्या सुरक्षिततेला प्राधान्य द्यावे, असे निर्देश महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांनी दिले.

विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित विभागातील ऊसतोड कामगार महिलांचे प्रश्न व स्त्रीभ्रूण हत्या प्रतिबंधक कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत आढावा बैठक घेण्यात आली. त्या बोलत होत्या.






यावेळी विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी, समाजकल्याण आयुक्त दीपा मुधोळ- मुंडे, आयोगाच्या सचिव नंदिनी आवाडे, उपसचिव डॉ. पद्मश्री बैनाडे उपस्थित होत्या.

यावेळी श्रीमती चाकणकर म्हणाल्या, पश्चिम महाराष्ट्रामध्ये मराठवाड्यातून येणाऱ्या महिला ऊसतोड कामगारांची संख्या अधिक आहे. त्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी निवासी शाळांची सुविधा उपलब्ध असावी. ऊसतोड महिलांमध्ये आरोग्याविषयी जनजागृती होणे आवश्यक आहे. मुलींच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होत असल्याने बालविवाहांचे जास्त प्रमाण आढळून येते. त्यामुळे बालविवाह प्रतिबंधक कायद्याची प्रभावी अंमलबजावणीही आवश्यक आहे. गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार महामंडळाच्यावतीने ऊसतोड कामगारांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांचा लाभ त्यांना दिला जावा. महिलांविषयक कायदे राबवितांना सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे. यासाठी महिला आयोग सदैव पाठीशी राहील.

त्या म्हणाल्या, कंत्राटदार नोंदणी, ऊसतोड कामगार नोंदणीकडे लक्ष देणे आवश्यक आहे. ग्रामीण भागात सर्व महिलांविषयक कायदे व समित्यांबाबत जनजागृती करावी. वन स्टॉप सेंटर साठी पूर्णवेळ अधिकारी-कर्मचारी नेमावेत. प्रवासामध्ये महिलांना वापरण्याजोगे स्वच्छतागृहे असावेत. हुंडाबळी, स्त्रीभ्रूण हत्या प्रतिबंधाबाबतच्या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करावी, अशा सूचना त्यांनी दिल्या.

सक्षम महाराष्ट्र घडवत असताना राज्य शासन व राज्य महिला आयोग महिलांच्या आरोग्य आणि सुरक्षिततेला विशेष प्राधान्य देत असून पोलीस व आरोग्य विभागाकडून विविध उपाययोजना प्रभावीपणे राबविल्या जात आहेत. कायद्याच्या अंमलबजावणीसाठी काही सूचना असल्यास राज्य आयोगाला कळवाव्यात, महिलांच्या सुरक्षिततेसाठी गठीत करण्यात आलेल्या विविध समित्यांची जनजागृती स्थानिक पातळीवरही करण्यात यावी असे सांगून आषाढीवारीमध्ये महिलांना आरोग्यवारीच्या माध्यमातून चांगल्या सुविधा दिल्याचे त्यांनी सांगितले.

विभागीय आयुक्त डॉ. पुलकुंडवार म्हणाले, महिलांच्या समस्या संवेदनशीलपणे हाताळाव्यात. महिलांच्या सुरक्षिततेसाठी गठीत करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय समित्यांच्या नियमित बैठका घेण्यात याव्यात. साखर कारखान्यांवर त्यांची तात्पुरती निवासस्थाने उभारताना महिलांना सर्व सुविधा देण्यात याव्यात. लसीकरण, आरोग्य सुविधा, पिण्याचे पाणी, स्नानगृह, स्वच्छतागृह, आरोग्य तपासणी याबाबींवर लक्ष ठेवावे. सुविधांची पाहणी करण्यासाठी जिल्हास्तरीय समित्यांमधील अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करावी, असेही ते म्हणाले.

श्री. फुलारी यांनी पोलीस विभागामार्फत महिलांच्या सुरक्षिततेसाठी राबविण्यात येणाऱ्या कायद्यांची माहिती देऊन समस्येवर विविध उपाययोजना सुचविल्या.

सुरुवातीस श्रीमती मुंडे यांनी विभागातील साखर कारखान्यांची संख्या, ऊसतोड कामगारांची संख्या त्यांना पुरविण्यात येणाऱ्या सुविधांची व कायद्यांची माहिती सादरीकरणाद्वारे दिली.

श्रीमती आवाडे यांनी ऊसतोड महिलांची कामगार म्हणून नोंदणी व्हावी यासाठी कामगार विभागाने शासनाकडे पाठपुरावा करावा. ऊसतोड मजुरांच्या मुलांच्या शिक्षणासाठी योजना राबविण्याच्या दृष्टीने प्रयत्न व्हावेत, असेही त्यांनी सांगितले.

बैठकीला विभागातील जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, कामगार विभाग, आदिवासी विकास विभागाचे अधिकारी तसेच ऊसतोड कामगार संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. पुणे, सातारा, सोलापूर, सांगली व कोल्हापूर जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.

# हिंदू मुस्लिम ऐक्य निर्माण करणारे सैलानी बाबा यांचा ऊरुस कासार खेड्यात साजरा





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**


लातूर प्रतिनिधी/सुधाकर रणदिवे : लातूर पासून कांहीं अंतरावर असणाऱ्या कासारखेडा गावात प्रतिवर्षी साजरा होणारा सैलानी बाबा ऊर्फ हाजी अब्दुल रहमान रहेमतुंल्लाअलै यांचा उर्स कासारखेडा गावात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी दर्ग्याचे मुख्य पुजारी प्रशांत शिंदे,तसेच समाजप्रबोधनकार, व्याख्याते सुफी सय्यद शमशोद्दीन, यांच्या प्रमुख उपस्थितीत फातेहाखाणी संपन्न झाली. कासारखेडा हे लहान गाव असुन अबालवृद्ध या कार्यक्रमा ला उपस्थित होते, पुर्ण गावात पारंपरिक वाद्य वाजत गाजत मिरवणूक ९ वाजता दर्गा येथे पोहचली.विधीवत चादर गिलाफ ईत्र,उद ईत्यादि सुगंधीत वातावरणात दर्गावर चादर चढवण्यात आली.यावेळी सुफी सय्यद यांनी गावात व देशात बंधूभाव असाच कायम रहावा, सर्वांना निरोगी आयुष्य लाभावे यासाठी दुवा मागितली. उरसामध्ये गजबजून खेळणी व जिवन आवश्यक वस्तूंचा बाजार ही पहावयास मिळाला. तसेच शेवटी महाप्रसाद वाटप करण्यात आला.

यावेळी मुख्य मुजावर प्रशांत शिंदे, अनिल शिंदे, प्रविण शिंदे, गोविंद शिंदे, महेश वाघमारे, प्रितम थो, शम्भू देवकते, स्वप्नील गुंडरे, युनुस भाई शेख, वशीम शेख, पत्रकार संतोष सोनवणे, आकाश कांबळे इत्यादी भाविक भक्त उपस्थित होते. पोलीस प्रशासनाकडूनही चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# स्वेरी फार्मसीच्या २९ विद्यार्थ्यांची 'मॅकलॉइड्स फार्मास्युटिकल्स लिमिटेड' मध्ये निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : 'गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूटचे संस्थापक डॉ. बी. पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वेरी संचालित कॉलेज ऑफ फार्मसीमधील बी. फार्मसीचे १७ आणि डी.फार्मसीचे १२ अशा तब्बल २९ विद्यार्थ्यांची गुजरात येथील आंतरराष्ट्रीय दर्जा असलेल्या 'मॅकलॉइड्स फामस्युटिकल्स लिमिटेड' या औषध निर्मिती क्षेत्रातील कंपनीत कॅम्पस इंटरव्यूव्हद्वारे निवड करण्यात आली आहे.' अशी माहिती बी. फार्मसीचे प्राचार्य डॉ. मिथुन मणियार यांनी दिली.




'मॅकलॉइड्स फार्मास्युटिकल्स लिमिटेड' या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कंपनीचे मॅनेजर आणि त्यांच्या निवड समितीने स्वेरीज कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयात १८ फेब्रुवारी २०२६ रोजी घेतलेल्या इंटरव्यूव्हमधून डी. फार्मसी व बी. फार्मसीच्या एकूण २९ विद्यार्थ्यांची निवड केली आहे. गुणात्मक अभ्यासाबरोबरच शिस्त, आदरयुक्त संस्कृती व उत्कृष्ठ शिक्षणपध्दती यामुळे निवड समिती अत्यंत प्रभावीत झाली. निवड समितीच्या अंतिम प्रकियेतून फार्मसीच्या अंतिम वर्षात शिक्षण घेणारे वैष्णवी मनोज देवरडे, काजल रणजित भोसले, आदित्य राजेंद्र बोडके, प्रियांका सुभाष मोकळे, प्रचिती वसंत काटकर, आरती बजरंग मेटकरी, सुमेध औदुंबर वाघमारे, सोमनाथ आबा गावंधरे, संदीप दत्तात्रय काळे, मयूर बाबासाहेब फंड, समीर चंद्रकांत शिंदे, रोहित काळाप्पा माळी, आदित्य नामदेव खुळे, आदर्श अंकुश चव्हाण, रुजुल शरद भोसले, हरी संजय खोत व अंकिता बापू लेंगरे आणि डी. फार्मसीच्या अंतिम वर्षात शिक्षण घेणारे गणेश अनिल ढोणे, विनोद हणमंत बंडगर, आर्यन ज्ञानेश्वर शेळके, महेश राजेंद्र नाईकनवरे, श्रीकांत दुंडप्पा नरुटे, सतीश सिद्धराम कोळी, आदित्य बाबासाहेब भंडारे, निखिल नंदकुमार पवार, प्रमोद चंद्रकांत काळे, आदेश हणमंत पारसे, समाधान सुरेश नरळे व अमेय दिनेश जाधव या २९ विद्यार्थ्यांची 'मॅकलॉइड्स फार्मास्युटिकल्स लिमिटेड' या कंपनीत 'क्वालिटी कंट्रोल आणि प्रॉडक्शन' या विभागामध्ये निवड करण्यात आली आहे. १९९८ साली अभियांत्रिकी महाविद्यालयाची स्थापना झाली. त्यानंतर उच्च शिक्षण घेण्यासाठी ग्रामीण भागातील विद्यार्थी इतर शहराकडे धाव घेत होते आणि शिक्षणाची गरज ओळखून ग्रामीण भागातील नागरिकांचा पैसा आणि वेळेची बचत होवून अपेक्षित उच्चशिक्षण मिळावे या हेतूने स्वेरीचे संस्थापक डॉ. बी. पी. रोंगे आणि इतर पदाधिकाऱ्यांनी पंढरपूर पंचक्रोशीतील नागरिकांच्या मागणीनुसार २००६ साली फार्मसीची स्थापना केली. अभियांत्रिकीच्या पाऊलांवर पाऊल ठेवून फार्मसीची देखील यशस्वी वाटचाल सुरु आहे. प्रत्येक वर्षी परीक्षेमध्ये उत्कृष्ठ निकाल, विद्यार्थ्यांचे प्लेसमेंट होण्याच्या संख्येत लक्षणीय वाढ होत आहे हे दिसून येत आहे. कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. मिथुन मणियार यांनी सांगितले की, 'विद्यार्थ्यांसाठी कॅम्पस ड्राईव्ह आयोजित करण्याचा उद्देश, त्यांना उत्तम करिअर संधी उपलब्ध करून देणे आहे. त्याचबरोबर स्वेरीतील विद्यार्थ्यांसाठी भविष्यात आणखी कॅम्पस ड्राईव्हचे आयोजन सातत्याने केले जाईल.' निवड झालेल्या विद्यार्थ्यांना संस्थेचे संस्थापक डॉ. बी. पी. रोंगे, फार्मसीचे प्राचार्य डॉ. मणियार, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाचे समन्वयक प्रा. कोमल परचंडे यांच्यासह इतर प्राध्यापकांचे सहकार्य लाभले. निवड झालेल्या २९ विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक डॉ. बी.पी. रोंगे, संस्थेचे अध्यक्ष अशोक भोसले, उपाध्यक्ष सुरेश राऊत, सचिव डॉ. सुरज रोंगे, संस्थेचे इतर पदाधिकारी व विश्वस्त, सर्व संचालक मंडळ, प्राचार्य, प्राध्यापक वर्ग, पालक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थ्यांनी व पालकांनी अभिनंदन केले.

# ग्राहक म्हणून नेहमी जागरुक रहा : तहसीलदार सचिन लंगुटे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : ग्राहक हा बाजारपेठेचा राजा आहे. ग्राहकांना वस्तू निवडणे, त्याची गुणवत्ता आणि दर्जा यांचे प्रमाण जाणून घेण्याचा, माहिती मिळविण्याचा अधिकार आहे. अनेकदा वस्तू खरेदी करताना ग्राहक बऱ्याच गोष्टींकडे दुर्लक्ष करतात आणि याचाच गैरफायदा विक्रेते घेतात. त्यामुळे ग्राहकाने नेहमी जागरूक राहावे असे आवाहन तहसीलदार सचिन लंगुटे यांनी केले.

तहसील कार्यालय पंढरपूर येथे १५ मार्च हा जागतिक ग्राहक दिन साजरा करण्यात आला. यावेळी नायब तहसीलदार बालाजी पुदलवाड, पुरवठा निरीक्षक विजय बादल, पुरवठा सहा. उमेश हिंगमिरे, नेताजी ओव्हाळ, ग्राहक पंचायतीचे सह सचिव आझाद आल्लापूरकर, मंडळ अधिकारी, नागरिक तसेच कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी तहसीलदार श्री. लंगुटे म्हणाले, दरवर्षी १५ मार्च रोजी साजरा होणारा जागतिक ग्राहक हक्क दिन हा दिवस ग्राहकांच्या अधिकारांविषयी जागृती वाढविण्यासाठी महत्त्वाचा मानला जातो. ग्राहकांना सुरक्षित दर्जेदार आणि पारदर्शक सेवा मिळाव्यात तसेच त्यांच्या तक्रारींना न्याय मिळावा यासाठी शासन विविध उपक्रम राबवत आहे. ग्राहकांना बाजारपेठेत खरेदी करताना अनेकदा चुकीची माहिती निकृष्ट दर्जाचे उत्पादने किंवा फसवणुकीला सामोरे जावे लागते. यासाठी ग्राहकांनी कोणतीही वस्तू घेताना पक्की पावती घेणे आवश्यक आहे. घेतलेल्या वस्तूमध्ये काही कारणास्तव खराबी किंवा त्याच्या सेवेमध्ये त्रुटी आल्यास त्या पावतीचा महत्त्वाचा उपयोग आपल्याला ग्राहक तक्रारीमध्ये करता येतो. आपण घेतलेल्या वस्तूंमध्ये काही त्रुटी आढळल्यास ग्राहक कायद्याअंतर्गत आपण जिल्हा ग्राहक न्यायालयात दाद मागू शकतो तसेच अखिल भारतीय ग्राहक पंचायत यासारख्या विविध संघटनांची मदत घेऊन आपण या तक्रारींची निरसरण करू शकतो असेही त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी ग्राहक पंचायतीचे सह सचिव अल्लापुरकर यांनी ग्राहक कायदा विषयक माहिती सांगून ग्राहक न्यायालयांमध्ये कशाप्रकारे तक्रारी मांडू शकतो आणि सार्वजनिक तक्रारी असतील तर त्या सीसीपीए या ग्राहक समितीकडे आपण कशा पद्धतीने मांडू शकतो याच्याबद्दल मार्गदर्शन केले. तालुक्यातील नागरिकांना काही अडचणी आल्यास अखिल भारतीय ग्राहक पंचायत पंढरपूर तालुका यांच्याकडून वेळोवेळी मार्गदर्शन करून आपले प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला जाईल असे सांगितले.

यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक पुरवठा निरीक्षक विजय बादल यांनी केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पुरवठा सहाय्यक उमेश हिंगमिरे यांनी केले तर उपस्थितांचे आभार पुरवठा सहाय्यक नेताजी ओव्हाळ यांनी केले.

रयतमाउली सौ. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या ९६ व्या पुण्यतिथीनिमित्त विशेष कार्यक्रम

# लक्ष्मीबाईंच्या अश्रूंमधून उभा राहिला रयतचा वटवृक्ष : प्रा. पोपट काटकर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : स्त्रियांच्या अश्रूंमध्ये परिवर्तनाची प्रचंड ताकद असते; सीतेच्या अश्रूंनी रामायण आणि द्रौपदीच्या अश्रूंनी महाभारत घडले, त्याचप्रमाणे लक्ष्मी वहिनींच्या अश्रूंमधून रयत शिक्षण संस्थेचा विशाल वटवृक्ष उभा राहिला. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी समाजातील अज्ञान, दारिद्र्य आणि विषमता दूर करण्यासाठी शिक्षणाची चळवळ उभारली; मात्र त्या चळवळीच्या पाठीशी लक्ष्मीबाईंचा निःस्वार्थ त्याग, माया आणि समर्पण यांची भक्कम साथ होती. वसतिगृहातील विद्यार्थ्यांना आईसारखे प्रेम देणे, त्यांची उपासमार होऊ नये म्हणून स्वतःचे सुख त्यागणे, त्यांच्या जीवनात आत्मीयता निर्माण करणे ही कार्ये त्यांनी निष्ठेने पार पाडली. असे प्रतिपादन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते प्रा. पोपट काटकर यांनी केले.



येथील रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयात समारंभ समिती, सांस्कृतिक विभाग आणि 'कमवा व शिका' योजना समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रयतमाउली सौ. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या ९६ व्या पुण्यतिथीनिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ बी. टी. जाधव हे होते.

या कार्यक्रमाची सुरुवात रयतमाउली सौ. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तसेच पाहुणे व अध्यक्षांचा परिचय सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. डॉ. रमेश शिंदे यांनी करून दिला.

रयत माऊली सौ. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील : जीवन व कार्य या विषयावर प्रमुख वक्ते प्रा. पोपट काटकर यांनी अत्यंत प्रभावी व प्रेरणादायी मनोगत व्यक्त केले. त्यांनी आपल्या भाषणात लक्ष्मीबाई पाटील यांच्या त्यागमय जीवनाचा सखोल ऊहापोह केला. ते पुढे म्हणाले की, लक्ष्मीबाई यांनी ८० तोळे सोन्याचा त्याग केला. हा त्याग केवळ आर्थिक नव्हता, तर तो सामाजिक बांधिलकीचा आणि मूल्यनिष्ठतेचा आदर्श होता. स्वाध्याय, स्वावलंबन, स्वाभिमान आणि स्वातंत्र्य या चतु:सूत्रीवर उभ्या असलेल्या रयत शिक्षण संस्थेच्या उभारणीत लक्ष्मीबाईंच्या प्रेमळ त्यागाचे खत पडले असल्यामुळेच ही संस्था आज वटवृक्षासारखी फोफावली आहे, असे त्यांनी नमूद केले. लक्ष्मीबाईंच्या व्यक्तिमत्त्वातील सहिष्णुता आणि सर्वधर्मसमभाव यावर भाष्य करताना त्यांनी सांगितले की, प्रारंभीच्या सनातनी संस्कारांवर मात करून त्यांनी सर्व समाजघटकांना आपलेसे केले. त्यांच्या आयुष्यातील त्याग, संयम आणि मातृत्वभाव या गुणांमुळेच त्यांना रयत माऊली ही उपाधी प्राप्त झाली. त्यांचे कार्य हिमालयापेक्षा उंच आणि महासागरापेक्षा अथांग आहे, असे गौरवोद्गार त्यांनी काढले.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव यांनी रयत आणि माउली या संकल्पनांतील मूल्यांचा वेध घेत, लक्ष्मीबाईंच्या कार्याचा आदर्श आजच्या पिढीने आत्मसात करावा, असे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांचा शाल, पुस्तक व गुलाब पुष्प देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी कला विभागाचे उपप्राचार्य डॉ. भगवान नाईकनवरे, वाणिज्य विभागाचे उपप्राचार्य डॉ. सुशील शिंदे, कला विभागाचे अधिष्ठाता डॉ. समाधान माने, पदव्युत्तर विभागाचे अधिष्ठाता डॉ. बाळासाहेब बलवंत, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. अमर कांबळे, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य विठ्ठल काटकर, कार्यालयीन प्रमुख चौरंगनाथ वाघमारे यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सारिका भांगे यांनी केले, तर समारोप प्रसंगी आभार समारंभ समितीचे चेअरमन डॉ. दत्तात्रय डांगे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. राजेंद्र मोरे, प्रा. हरिभजन कांबळे, प्रा. बापूसाहेब घोडके, प्रा. अंकुश घुले, प्रा. मोहिनी सावंत,अभिजीत जाधव, अमोल माने, भीमराव मेटकरी आदींनी विशेष परिश्रम घेतले.

या कार्यक्रमास महाविद्यालयातील वरिष्ठ, कनिष्ठ व व्होकेशनल विभागातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गॅस एजन्सीनी २३ मार्च पासून ९६ तासात घरपोच गॅस सिलेंडर उपलब्ध करून द्यावेत : जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

**■ रमजान ईद हा सण झाल्यानंतर २३ मार्चपासून एकाही गॅस एजन्सी समोर गॅस सिलेंडर साठी लाईन लागणार नाही याची दक्षता घ्या**

**■ जिल्ह्यात घरगुती गॅसचा मागणीप्रमाणे पुरवठा होत असल्याने नागरिकांनी घाबरून जाऊ नये, ऑनलाइन बुकिंग केल्यानंतर ९६ तासात घरपोच गॅस मिळणार**

**■ रमजान ईद च्या पार्श्वभूमीवर पोलीस विभागाने शहर व ग्रामीण भागात गॅस एजन्सी असलेल्या भागात पेट्रोलिंग करावे**

**■ एलपीजी गॅस सिलेंडर बाबतच्या तक्रारी ९७६९९१९२२१ या व्हाट्सअप क्रमांकावर कराव्यात**


**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : मुस्लिम धर्मियांचा रमजान ईद हा सण २१ मार्च २०२६ रोजी साजरा होत आहे. त्यानंतर २३ मार्च २०२६ पासून जिल्ह्यातील सर्व गॅस एजन्सीनी गॅस वितरणात एकसूत्रता राखण्याकरता गोदाम, गॅस एजन्सी व इतर ठिकाणाहून गॅस सिलेंडरचे वितरण करू नये. जिल्ह्यात सर्वत्र घर-गुती वापराच्या गॅस सिलेंडरचा पुरवठा ऑनलाईन बुकिंग झाल्यानंतर ओटीपी द्वारे ९६ तासात घरपोच करावा, असे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले.

सोलापूर जिल्ह्यातील गॅस वितरणा संदर्भातील कार्यवाहीच्या अनुषंगाने जिल्हा परिषदेच्या सभागृहात आयोजित आढावा बैठकीत जिल्हाधिकारी आशीर्वाद मार्गदर्शन करत होते. यावेळी जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे, अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे, एलपीजी गॅस पुरवठा करणारे जिल्हा समन्वयक अधिकारी भुकय्या रघुकुमार यांच्या सह सोलापूर शहर व जिल्ह्यातील गॅस एजन्सी चे प्रतिनिधी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशीर्वाद पुढे म्हणाले की, घरगुती वापराच्या गॅस सिलेंडर बाबत २३ मार्च २०२६ पा-सून जिल्ह्यातील एकाही गॅस एजन्सी कडून रांगेत उभा राहून ग्राहकांना गॅस सिलेंडर देऊ नये. ऑनलाइन बुकिंग केल्यानंतर ओटीपी द्वारे ९६ तासात संबंधित एजन्सीने ग्राहकांना घरपोच गॅस सिलेंडर उपलब्ध करून द्यावेत. आपल्या गॅस एजन्सी व गोदाम समोर ऑनलाइन बुकिंग, घरपोच सेवेद्वारे गॅस मिळेल एजन्सी मध्ये गॅस मिळणार नसल्याबाबतचे बोर्ड दर्शनी भागात लावावेत. तसेच त्याबाबतचे एसएमएस आपापल्या ग्राहकांना मोबाईलवर पाठवावेत, असेही निर्देश त्यांनी दिले.

जिल्ह्यात एलपीजी चा पुरवठा मागणीप्रमाणे होत आहे. तरी संबंधित कंपन्यांनी त्याबाबतचा दैनंदिन अहवाल प्रशासनाला सादर करावा. कंपनीच्या स्तरावर गॅस विक्रेत्या साठी ज्या सूचना असतील त्या लेखी स्वरूपात गॅस विक्रेत्यांना द्याव्यात. दुसरे गॅस सिलेंडर वाटप शहरी भागात २५ दिवस तर ग्रामीण भागात ४५ दिवस आहे त्या नियमावलीचे काटेकोरपणे पालन करावे. गॅस एजन्सीने कोणताही अवैध व्यापार होणार नाही याकरिता आपल्या कर्मचाऱ्यांवर नियंत्रण ठेवावे. जर कुठेही असे होत असेल तर त्याबाबतची माहिती तत्काळ प्रशास-नाला द्यावी. संवेदनशील गॅस एजन्सी ची माहिती पुरवठा विभागाला द्यावी. त्याप्रमाणे त्या एजन्सीला पोलीस संरक्षण देण्याबाबत पोलीस विभागाला कळविण्यात येईल. तसेच पोलीस विभागाने रमजान ईद च्या पार्श्वभूमीवर गॅस एजन्सी सम ोर खरेदी होऊ नये याकरिता शहरी व ग्रामीण भागात पेट्रोलिंग करावे असेही जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सांगितले.



एलपीजी गॅस पुरवठा करणाऱ्या कंपन्याचे जिल्हा समन्वयक अधिकारी श्री. रघुकुमार यांनी गॅस पुरवठ्याच्या अनुषंगाने एचप-ीसीएल, बीपीसीएल व आयओसीएल यांच्याकडून एजन्सीसाठी आलेल्या सूचना दिलेल्या आहेत. जिल्ह्यात मागणीप्रमाणे एलपीजी गॅस पुरवठा मिळत असल्याचे सांगून २३ मार्च २०२६ पासून ऑनलाईन बुकिंग केल्यानंतर ओटीपी द्वारे ९६ तासात गॅस सिलेंडर एजन्सी उपलब्ध करून देतील, असे त्यांनी सांगितले.

प्रारंभी जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी ग्रामीण भागातील गॅस पुरवठ्याच्या अनुषंगाने माहिती दिली तर अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे यांनी सोलापूर शहरात एलपीजी गॅस पुरवठ्याच्या अनुषंगाने माहिती दिली.

## निफाड शहरात बीएसएनएल मोबाईल नेटवर्कचा बोजवारा; नागरिक संतप्त, तात्काळ सुधारणा करण्याची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड - शहरात भारत संचार निगम लिमिटेड (इडछङ) च्या मोबाईल नेटवर्क सेवेचा पूर्णपणे बोजवारा उडाल्याचे चित्र सध्या पाहायला मिळत आहे. गेल्या काही म हिन्यांपासून नेटवर्क अत्यंत मंद गतीने चालत असून, अनेकदा कॉल ड्रॉप, इंटरनेट बंद पडणे, तसेच सिग्नलच न मिळणे अशा समस्यांचा नागरिकांना वारंवार सामना करावा लागत आहे.

शहरातील व्यापारी, विद्या-र्थी, शासकीय कामकाज करणारे नागरिक तसेच ऑनलाइन व्यवहार करणाऱ्या लोकांना याचा मोठा फटका बसत आहे. डिजिटल व्यवहार, शैक्षणिक ऑनलाइन वर्ग, तसेच तातडीच्या संपर्कासाठी मोबाईल नेटवर्क अत्यावश्यक असताना इडछङची सेवा मात्र अपुरी ठरत असल्याने नागरिकांम ध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

याबाबत अनेक वेळा संबंधित विभागाकडे तक्रारी करण्यात आल्या असूनही अद्याप कोणतीही ठोस सुधारणा झालेली नाही. त्यामुळे नागरिकांनी प्रशासनाच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह उप-स्थित केले आहे.

निफाडमधील नागरिकांनी शासन व संबंधित दूरसंचार विभागाने तात्काळ याची दखल घेऊन नेटवर्क सेवा सुरळीत करण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी एकमुखी मागणी केली आहे. अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशाराही नागरिकांकडून देण्यात येत आहे.

## भारतीय वैदिक विज्ञान संशोधन संस्था, मुंबई आयोजित कर्तृत्ववान महिला सन्मान कार्यक्रम उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/पी. डी. पाटील :

शनिवार दिनांक १४ मार्च रोजी दादर (प) येथील गुरुकुल सभागृहामध्ये जागतिक महिला दिन सप्ताहाचे औचित्य साधून, ध्येयवादी महिलांना प्रोत्साहित करण्याच्या हेतूने कृषी, आरोग्य, साहित्य, शिक्षण, कला आणि अध्यात्म यांसारख्या विविध क्षेत्रांत स्व कर्तृत्वाच्या जोरावर आपल्या कार्याचा ठसा उमटविणाऱ्या महाराष्ट्रातील रणरागिणींचा शोध घेऊन त्यांना या सोहळ्यात 'राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करून ' सन्मानित करण्यात आले.



कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे ज्येष्ठ शिक्षणातज्ज्ञ व साहित्यिक डॉ.लक्ष्मण माधवराव शिवणेकर, राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शिक्षिका सौ.वसुंधरा शिवणेकर, ज्येष्ठ वैदिक वास्तु तसेच डाऊझिंग प्रशिक्षक, संस्थेचे अध्यक्ष प्रा. डॉ.आनंदसर , ज्येष्ठ कृषी अभ्यासक श्री प्रकाश वसंत पेडणेकर, ओरा अभ्यासक डॉ. चंद्रमोहन विष्णू रानडे हे या प्रसंगी उपस्थित होते.

भारतीय वैदिक विज्ञान संशोधन संस्था, ही मुंबईत गेली चोवीस वर्षे प्राचीन वैदिक विज्ञान विविध शास्त्रे विद्या कला वास्तुशास्त्र डाऊझिंग, वैकल्पिक वैद्यकीय संशोधन इत्यादी क्षेत्रात कार्य करते.

स्त्री शक्तीचा सन्मान आणि त्यांच्या कार्याला वैचारिक वैदिक सांस्कृतिक अधिष्ठान प्राप्त करून देत असताना वेदकालीन विदुषी स्त्रियांचे दिव्य स्मरण व्हावे, हा या पुरस्कारांच्या मुळाशी विचार असल्याने अदिती धरित्री संवर्धन, लोपामुद्रा, अन्नपूर्णा रससिद्धी, मैत्रेयी प्रज्ञा सन्मान, ब्रह्मवादिनी गार्गी, वाक अंभरुनी, अध्यात्म गौरव अशा समर्पक नावांच्या पुरस्काराची योजना आहे. वर्तमान काळात हाडांची काडं आणि रक्ताचं पाणी करून आपल्या मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी खस्ता खाते ती आई असते असे शिक्षण-तज्ज्ञ डॉ. शिवणेकर श्रोत्यांना संबोधीत करताना म्हणाले. स्त्री संघर्षातून मार्ग काढून यशस्वी होऊ शकते हे सिद्ध केल्याचे सांगून वसुंधरा शिवणेकर यांनी शुभेच्छा दिल्या. सन २०२६ वर्षातील पुरस्कार प्राप्त सन्माननीय महिलांमध्ये सौ. अनुसया वसंत कदम, सातारा: 'कृषी गोसेवा अदिती धरित्री संवर्धन पुरस्कार; सौ. मंदा लहू पवार,पुणे: 'लोपामुद्रा आरोग्य साधना राष्ट्रीय पुरस्कार'; डॉ. सौ. उज्वला म्हात्रे, नवी मुंबई:

**भारतीय वैदिक विज्ञान संशोधन संस्था, मुंबई तर्फे कर्तृत्ववान महिलांसाठी 'राष्ट्रीय पुरस्कार प्रदान सोहळा उत्साहात संपन्न**

'लोपामुद्रा आरोग्य साधना राष्ट्रीय पुरस्कार'; डॉ. पूनम द. पतंगे, पनवेल: 'लोपामुद्रा आरोग्य राष्ट्रीय पुरस्कार'; सौ. शोभना कानस्कर, नवी मुंबई: अन्नपूर्णा रससिद्धी राष्ट्रीय पुरस्कार; सौ. रंजना राजेंद्र शिंदे, मुंबई: साहित्यासाठी मैत्रेयी प्रज्ञा राष्ट्रीय पुरस्कार; सौ. कन्या सचिन आढाव, पुणे: शिक्षण व कला क्षेत्र ब्रह्मवादिनी गार्गी राष्ट्रीय पुरस्कार; सौ.नीता निशिकांत पाटील, सांगली: ब्रह्मवादिनी गार्गी राष्ट्रीय पुरस्कार; सौ.चारू वाखारकर,पुणे; ब्रह्मवादिनी गार्गी राष्ट्रीय पुरस्कार; सौ सविता अमर,मुंबई; योगशास्त्र : वाक अंभरुनी अध्यात्म गौरव राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. या सर्व सन्माननीय महिलांना संस्थेचे सुवर्णपदक, सन्मान चिन्ह, मानपत्र आणि संस्थेतर्फे निर्मित वनस्पतीजन्य आरोग्य उत्पादन भेट वस्तू देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. संस्थेचे पदाधिकारी, सदस्य, मान्यवर व प्रेक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.सौ.सुनंदा माने, पुणे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

## चालु हंगामातील आंबा व बागांचे वातावरणामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना तात्काळ भरीव मदत देण्याची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनिधी/सुधाकर रणदिवे : सन २०२६ चालु हंगामात आंबा बागांचे व आंबा पिकांचे वातावरणातील बदलामुळे मोठे नुकसान झाले आहे या पिकांचे नुकसानीचे पंचनामे करुन शेतकऱ्यांना तात्काळ भरीव मदत मिळवी अशी मागणी कळंब तालुक्यातील शेतकऱ्यांनी गणेश शिंदे उपविभागीय अधिकारी कळंब व तालुका कृषी अधिकारी भागवत सरडे यांना देण्यात आलेल्या निवेदनात केली आहे या निवेदनात सन २०२६ चालु हंगामात आंबा पिकास खुप मोठ्या प्रमाणात मोहोर लागला होता, परंतु वा-तावरणातील अचानक झालेल्या बदलामुळे आंबा बागांचे मोहोर पुर्ण करपुन गे-लेले आहेत.त्यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झालेले असुन या संकटापासून



बचावलेला अंबा ही तीव्र उष्णतेमुळे गळून पडत आहे, शिल्लक राहिलेले आंबा पिकांचे उत्पादन येण्याचे शक्यता फार कमी आहे. कळंब तालुक्यात आंबा उत्पादक शेतकऱ्यांची संख्या मोठी असून तालुक्यात २५० हेक्टर वर आंबा पिक घेतले जाते त्यामुळे आपण आपल्या क्षेत्रीय कर्मचाऱ्यांना सदरील बागांचे व पंचनामे करण्याचे आदेश देवून आम्ह-ाला झालेल्या नुकसानीची भरपाई देण्यात यावी आंबा पिकाच्या नुकसानी संदर्भात कोकण विभागात जो निकष आहे, तो निकष मराठवाड्यातील आंबा पीकासाठी लावण्यात यावा या वर्षी या गावामध्ये पाण्याच्या अवर्षणामुळे वृक्ष / झाडे जगवणे कठिण झालेले

आहे तेथील शेतकऱ्यांचे बोअरवेल बंद पडलेले आहेत. त्यामुळे पाण्याची कमतरता भासत आहे.

तरी आम्हाला आपणामार्फत पाण्याच्या टँकरची सोय दोन ते तीन म हिनेपर्यंत करुन देण्यात यावे अशी मागणी या निवेदनात समस्त शेतकऱ्यांच्या वती-ने करण्यात आली आहे या निवेदनावर तांदुळवाडी ग्रामपंचायतचे सरपंच प्रणित डिकले, प्रताप डिकले, भागवत शिंदे, अमर चोंदे,मनोज थोरात, लोमटे तात्या यांच्यासह शेतकऱ्यांच्या सह्या आहेत निवेदनाच्या प्रती

कृषीमंत्री महाराष्ट्र राज्य, मुंबई,पालकमंत्री,धाराशिव जिल्हाधिकारी साहेब, धाराशिव जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालय धाराशिव, यांना देण्यात आल्या आहेत, निवेदन देण्यासाठी तालुक्यातील आंबा पिक उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कळंब येथील उप विभागीय अधिकारी कार्यालयासमोर लोक जनशक्ती पार्टीचे धरणे आंदोलन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : कळंब येथील उप विभागीय अधिकारी कार्यालया समोर लोक जनशक्ती पार्टीच्या वतीने दि. १७ मार्च २०२६ रोजी एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी मुंबई येथील दादर रेल्वे स्टेशनला डॉ. बाबासाहेब आंबेडकर चैत्यभूमी रेल्वे स्टेशन असे नाव देण्यात यावे. या मागणीसाठी लोक जनशक्ती पार्टी रामविलास पासवान धाराशिव जिल्हाअध्यक्ष राजाभाऊ अण्णा गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली हे धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी उपविभागीय अधिकारी साहेब यांना या मागणीचे निवेदन देण्यात आले. या धरणे आंदोलनात लोक जनशक्ती पार्टीचे धाराशिव जिल्हाध्यक्ष राजाभाऊ अण्णा गायकवाड, तालुका अध्यक्ष भारत कदम, उपाध्यक्ष गौतम हजारे, शहर प्रमुख नागेश धीरे, मुकेश गायकवाड, रवींद्र गायकवाड,दीपक हौसलमल, भाऊ कुचेकर, उमरगा तालुका अध्यक्ष कुंदन कांबळे, बाळासाहेब सोनवणे यांच्या सह कार्यकर्ते समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**स्वेरीच्या इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागाचा पालक मेळावा संपन्न**

**पालक प्रतिनिधी अर्चना बाबर यांचे प्रतिपादन**

# स्वेरीतील शिस्त व संस्कारामुळे पाल्यांचा व्यक्तीमत्व विकास

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर- 'पाल्याचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी स्वेरी कॉलेजमधील प्राध्यापक वर्ग सर्वोतोपरी प्रयत्न करत असतात, परिश्रम घेतात. त्यातून स्वे-रीमधील शिस्त व संस्कारामुळे आमच्या पाल्याच्या व्यक्तिमत्व विकासात भर पडत आहे. त्यामुळे आम्ही मनस्वी समाधानी आहोत. सर्वात वेगळेपण जपणारी शिक्षणसंस्था म्हणून स्वेरीची स्वतंत्र ओळख निर्माण झाली आहे.' असे प्रतिपादन पालक प्रतिनिधी सौ. अर्चना बाबर यांनी केले.




गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) च्या इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागाचा पालक मेळावा शनिवार, दि.१४ मार्च २०२६ रोजी संपन्न झाला. या मेळाव्यात महिला पालक प्रतिनिधी म्हणून सौ.अर्चना बाबर ह्या बोलत होत्या तर पुरुष पालक प्रतिनिधी म्हणून मल्लिकार्जुन शेट्टी हे उपस्थित होते. संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी. पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार व विभागप्रमुख डॉ.चित्रसेन मैतेई यांच्या नेतृत्वाखाली या पालक मेळाव्याचे आयोजन केले होते. दिपप्रज्वलनानंतर प्रास्ताविकात प्रा. व्ही.ए. सावंत यांनी इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागातील अद्ययावत साधनांची माहिती, वसतिगृह, रात्र अभ्यासिका, इफेक्टिव्ह टीचिंग-लर्निंग, तसेच इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागात राबविण्यात येणारे विविध उपक्रम व गुणवत्तेबाबत महिती दिली. ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाचे समन्वयक डॉ.सचिन खोमणे यांनी स्वे-रीमध्ये विद्यार्थ्यांच्या प्लेसमेंट साठी कोणकोणती प्राथमिक तयारी करून घेतली जाते यावर भाष्य करून मागील वर्षापर्यंतची प्लेसमेंटची आकडेवारी सादर केली. अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रिया अधिष्ठाता प्रा. उत्तम अनुसे यांनी 'सातत्यपूर्ण अभ्यासक्रमामुळे स्वेरीतील विद्यार्थी यशस्वी होतात' याबाबत लक्षवेधी भूमिका मांडली. पुरुष पालक प्रतिनिधी म्हणून बोल-ताना मल्लिकार्जुन शेट्टी म्हणाले की, 'स्वेरी म्हणजे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कटीबद्ध असलेली शिक्षणसंस्था आहे.' असे सांगून स्वेरीत शिक्षण घेण्याचे फायदे सांगितले. उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार म्हणाल्या की, 'विद्यार्थ्यांच्या जडणघडणीमध्ये पालकांचा विशेष वाटा असतो. त्यामुळे पालकांनी वेळोवेळी महाविद्यालयात येवून संबंधित विभागाला भेट देऊन आपल्या पाल्याच्या प्रगतीबाबत माहिती जाणून घ्यावी. यामुळे शिक्षक, पालक व संस्था यामध्ये योग्य तो संवाद घडून येतो. याचा फायदा विद्यार्थ्यांच्या जडणघडणी मध्ये होतो.' असे सांगितले. यानंतर मान्यवरांनी पालकांच्या सर्व शंकांचे निरसन केले. यावेळी जवळप-ास ६० पालक तसेच इन्फ्रास्ट्रक्चर अधिष्ठाता डॉ.डी.ए. तंबोळी, इतर प्राध्यापक वर्ग उपस्थित होते. पालक मेळाव्यानंतर पालक वर्ग व प्राध्यापक वर्ग यांनी एकत्रित चर्चा करून पाल्याचे करिअर कसे उज्वल होईल यावर चर्चा केली. हा पालक मेळावा यशस्वी करण्यासाठी इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन प्रा. डी. डी डफळे यांनी केले तर समन्वयक प्रा.व्ही.ए. सावंत यांनी उपस्थितांचे आभार मानले.